महाराष्ट्र पोलीस

# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र- ६१ दिनांक:- १६ / ०३ / २०२१

## ऑनलाईन वाहन बुक करुन राष्ट्रीय महामार्गावर चालकांना लुटणा-या टोळीस वालीव पोलीसांनी अवघ्या २४ तासात केले गजाआड

दिनांक १४/०३/२०२१ रोजी फिर्यादी उबेर चालक नामे - विमल रामशंकर शर्मा, वय - २८ वर्षे, रा. धरावी मुंबई हे त्याच्या ताब्यातील उबेर कॅब गाडी घेवुन दिनांक १४/०३/२०२१ रोजी ०१.३० वाजता नालासोपारा पुर्व रेल्वे स्टेशन येथे गि-हाईकाची वाट पाहत उभे असताना उबेर ॲप्लीकेशन वरुन jay या युझर आयडी वरुन नालासोपारा पुर्व रेल्वे स्टेशन ते मीरारोड करीता बुंकीग आली. सदर बुकिंग प्रमाणे फिर्यादी हा तीन आरोपीत इसमांनी नालासोपारा ईस्ट रेल्वे स्टेशन येथुन मीरारोड पुर्व येथे घेवुन जात असताना अहमदाबाद-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर पहाटे ०२.०० वा सुमारास सातिवली ब्रिजचे जवळ सर्वीस रोडवर आरोपीत यांनी लघुशंकेस जायचा बहाणा करुन उबेर चालक यास गाडी थांबवीण्यास सांगितले. फिर्यादीने गाडी सर्वीस रोडचे बाजुस घेतली असता तीन्ही आरोपीत यांनी आपसात संगनमत करुन रात्रीचे वेळी एकांतवासाचा फायदा घेवुन उबेर चालक यास मारहाण शिवीगाळी करुन फिर्यादी जवळील मोबाईल व इतर ऐवज जबरदस्तीने हिसकावुन घेवुन पळुन गेले. अशी फिर्याद वालीव पोलीस ठाणे येथे फिर्यादीने दिले वरुन ३ अज्ञात इसमांविरुध्द वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २७८/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३९२,३४ अन्वये विरुध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वालीव गुन्हेप्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच तपासाची चक्रे फिरवुन घटनास्थळावरील बारकावे, तांत्रिक विश्लेषण, सिसिटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदार यांचे आधारे घटना घडल्यापासुन २४ तासाचे आत गुन्हयातील तिन्ही आरोपीत यांना कौशल्याने निष्पन्न करुन त्यातील २ आरोपीत नामे. १) सिध्देश नितिन दळवी वय : २१ वर्षे रा. नालासोपारा पुर्व, व २) पंकज मोहनलाल भाटीया वय : २१ वर्षे रा. ठि. नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर मुळ रा.हनुमानपुरा, राज्य राजस्थान. यांना अटक केली आहे.

वरील कामगिरी मा.श्री.प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-३ विरार, श्री.अमोल मांडवे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुंळीज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब कारांडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे, पो.उप.निरी/मिथुन भोईर, पोहवा/८१३ योगेश देशमुख, पोना/१३३२ किरण म्हात्रे, पो.ना./३०२१ सचिन दोरकर, पो.ना./३७३ सतिष गांगुर्डे, पो.ना./१०७७ राजेंद्र फड, पो.अंम./२२४६ विनेश कोकणी, पो.शि/१४९ बालाजी गायकवाड, पो.शि./१४७ सचिन बलीद यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.